**<u>नियमित दिवाणी दावा क्र.</u>** - २३/२०१६

सुकदेव केदु शिंदे . . . वादी

**<u>विरूध्द</u>**

देवमन रावबा शिंदे व इतर . . . प्रतिवादी

**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

<u>(घोषित दिनांक - ३१/१०/२०१७)</u>

१. या कामी वादीने सदरचा दावा डोंगरगांव, ता. चांदवड येथील गट क्र. ३५/१ व ३५/२ या मिळकतीचे पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण बांधाची प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी नासधुस करू नये व अतिक्रमण करू नये तसेच त्या मिळकतींमध्ये जाण्यास गट क्र. ३३ व ४१४ दरम्यान वहिवाटी रस्त्यास हरकत अडथळा करू नये, तसेच गट क्र. ३८ मधिल सामाईक विहीरीच्या पाणीचा १/४ चा हिस्सा वादींना घेण्यास हरकत अडथळा करू नये अस निरंतर ताकीद मिळण्यासाठी दावा दाखल केला असून त्यासोबत **निशाणी क्र. ५** चा तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे व त्यात उपरोक्त तीन्ही मागण्या मागितलेल्या आहेत.

२. प्रतिवादी क्र. १ ते ६ व ८ यांनी **निशाणी क्र. २०** अन्वये कैफियत व खुलासा दिलेला आहे. प्रतिवादी क्र. ७ विरूध्द एकतर्फा प्रकरण चालविण्याचा आदेश करण्यात आलेला आहे. **निशाणी क्र. २०** वरील कैफीयत व खुलासाप्रमाणे प्रतिवादींनी वादीचे सर्व कथन नाकारलेले आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, पुर्वीप्रमाणे बांध असल्याचे तसेच गट क्र. ३८ वरील विहीरीवरील सामाईक मालकी मान्य केले आहे, तथापि सदर विहीर पडीत असल्याचे नमुद केले आहे. पुढे त्यांनी असेही नमुद केले आहे की, वादीने लभाबीडे महाशय तहसिलदार यांच्याकडील केस क्र. - ६/२०१५ दाखल केली होती व त्याच्या निकालाविरूध्द महाशय उप-विभागिय अधिकारी यांच्याकडे रिव्हीजन प्रलंबित आहे. तसेच याच कथनासंदर्भात रे.मु.नं. - १२७/२००६ दाखल केला असून प्रतिवादींविरूध्द एकतर्फी निकाल झालेला आहे. त्यामुळे त्याच कारणासाठी नव्याने दाखल करता येत नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

३. अर्ज व म्हणणे यामध्ये आलेल्या कथनांवरुन खालील वादबिंदु विचाराकरिता

माइयासमोर उपस्थित झाले व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे -

| अ.क्र. | वादबिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने जातो काय ? | **नकारार्थी.** |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमित अशी हानी होईल काय ? | **नकारार्थी.** |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

४. दोन्ही पक्षकारांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला तसेच दाखल केलेले दस्तऐवज पाहिले.

**<u>वादबिंदु क्र. १ करिता</u>** -

५. वादीने असे कथन केले आहे की, डोंगरगांव, ता. चांदवड येथील गट क्र. ३५/१ व ३५/२ या मिळकती वादीच्या मालकीच्या व कब्जे वहिवाटीतील असून अन्य प्रतिवादींचा मालकीचा गट क्रमांक खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | गट क्रमांक | मालक |
|---|---|---|
| १ | ३३ | प्रतिवादी क्र. २ |
| २ | ३७ व ४१ | प्रतिवादी क्र. १ |
| ३ | ४२ | प्रतिवादी क्र. ७ व ८ |
| ४ | ३८ | सामाईक विहिर त्यात (वादीचा १/४ हिस्सा, प्रतिवादी क्र. ३ ते ६ चा १/४ हिस्सा, प्रतिवादी क्र. २ संजय, पांडु व रावबा यांचा १/४ हिस्सा व बाळू शिंदे वगैरे यांचा १/४ हिस्सा) |
| ५ | ३९ | प्रतिवादी क्र. ३ ते ६ |

६. पुढे त्याने असेही कथन केले आहे की, गट क्र. ३५/१ मध्ये वादी हे डोंगरगांव-राहूड रस्त्याने गट क्र. ३३ व ४१४ मिळकतीपर्यन्त आल्यावर तेथून पश्चिमेकडून

तीरकस गट क्र. ४१४ व ३३ या दरम्यान पूर्वापारच्या रस्त्याने वादी त्याचे गट क्र. ३५ व ३५/२ मध्ये जातात. त्याचप्रमाणे गट क्र. ३३, ३५/१ व ३६ तसेच गट क्र. ५८, ४१४ व ४१० यादरम्यान पुर्वपार रस्त्याने इतरही लगतचे कब्जेदार सदर रस्त्याचा वापर करतात. त्यासंदर्भात वहिवाट केस क्र. - ६/२०१५ महाशय तहसिलदार यांच्याकडे चालू असून त्याचा निकाल गट क्र. ४१० च्या मालकाच्या बाजूने झालेला आहे.

७. त्याने पुढे असेही नमुद केले आहे की, गट क्र. ३५/२ व ३७ दरम्यान पुर्व-पश्चिम बांध तसेच गट क्र. ४१ दरम्यान उत्तर-दक्षिण बांध असून गट क्र. ४१० च्या मालकाने त्यासंदर्भात महाशय तहसिलदार यांच्याकडे वहिवाट केस दाखल केली होती व प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीने जबाब दाखल न केल्यामुळे त्याचा राग येवून त्या पूर्व-पश्चिम बांधाची व गट क्र. ४१ तसेच ३५/२ मधिल उत्तर-दक्षिण बांधाची नांगराच्या सहाय्याने वादीला हरकत केली व नासधूस केली. तसेच गट क्र. ३८ मधिल सामाईक विहीरीचे क्षेत्र देखील प्रतिवादी क्र. २ यांनी गट क्र. ३७ मध्ये समाविष्ट करून घेतले. शिवाय गट क्र. ३८ मधिल विहिरीचे पाणी ऑईल इंजिनच्या सहाय्याने घेण्यास हरकत अडथळा केला. दरम्यान प्रतिष्ठीतांसमोर समजोता झाल्यावर मोजणी करण्याचे मान्य झाले व मोजणी झाल्यावर अतिरीक्त जमिन देण्याचेदेखील मान्य झाले. तथापि, प्रतिवादींनी मोजणीला संमती दिली नाही. त्यामुळे वादीला दावा दाखल करावा लागला आहे. वादीने पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण बांधाची प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी नासधुस करू नये व अतिक्रमण करू नये तसेच त्या मिळकतींमध्ये जाण्यास गट क्र. ३३ व ४१४ दरम्यान वहिवाटी रस्त्यास हरकत अडथळा करू नये, तसेच गट क्र. ३८ मधिल सामाईक विहीरीच्या पाणीचा १/४ चा हिस्सा वादींना घेण्यास हरकत अडथळा करू नये अस निरंतर ताकीद मिळण्यासाठी दावा दाखल केला.

८. वादीने युक्तीवाद करतांना काही दस्तऐवज देखील दाखल केले असून मोजणीला प्रतिवादी क्र. २ संजय व वादी यांनी निमतांनदारसमोर हरकत घेतल्याचा जबाब दाखल आहे. तसेच काही फोटो देखील दाखल करण्यात आलेले आहेत.

९. प्रतिवादी क्र. ७ वगळता अन्य प्रतिवादी या प्रकरणात हजर झाले असून त्यांनी असे कथन केले आहे की, पुर्वीप्रमाणे बांध असल्याचे तसेच गट क्र. ३८ वरील विहीरीवरील

सामाईक मालकी मान्य केले आहे, तथापि सदर विहीर पडीत असल्याचे नमुद केले आहे. पुढे त्यांनी असेही नमुद केले आहे की, वादीने लभाबीडे महाशय तहसिलदार यांच्याकडील केस क्र. - ६/२०१५ दाखल केली होती व त्याच्या निकालाविरूध्द महाशय उप-विभागिय अधिकारी यांच्याकडे रिव्हीजन प्रलंबित आहे. तसेच याच कथनासंदर्भात रे.मु.नं. - १२७/२००६ दाखल केला असून प्रतिवादींविरूध्द एकतर्फी निकाल झालेला आहे. त्यामुळे त्याच कारणासाठी नव्याने दाखल करता येत नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

१०. वादीने दावा दाखल करतांना दाव्यासोबत सर्व दिशा व जागा दर्शविणारा गाव नकाशा दाखल करणे आवश्यक होता. किमान तसा नकाशा हाताने काढून तो दाखल केला असता तर वादीने दाव्यात केलेले कथन समजण्यास सोपे गेले असते. परंतु वादीने तसे केलेले नाही व गुंतागुंतीची मांडणी केलेली आहे. प्रतिवादींतर्फे रे.मु.नं. १२७/२००६ या दाव्याच्या न्यायनिर्णयाची व हुकूमनाम्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यात शिवाजी भिका शिंदे हा वादी असून गट क्र. ३६ चा तो मालक असल्याचे त्यात कथन आहे. त्याला या दाव्यामध्ये पक्षकार करण्यात आलेले नाही. तथापि, गट क्र. ३६ चा ब-याच ठिकाणी उल्लेख दाव्यात करण्यात आलेला आहे. त्याच दाव्यात वादी हा प्रतिवादी क्र. २ दर्शविला असून या प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ व २ हे देखील त्या प्रकरणात प्रतिवादी होते.

११. त्या न्यायनिर्णयात असे कथन करण्यात आले आहे की, ‘‘वादीच्या दावा मिळकत गट क्र. ३६ मध्ये येण्यासाठी गट क्र. ३५ च्या पश्चिमेकडील उत्तर-दक्षिण रस्ता असून तो गट क्र. ४१४ च्या पूर्व दिक्षेला आहे तो १० फुट रूंदीचा व ३०० फुट लांबीचा रस्ता आहे ------------ ’’. त्याच दाव्यात गट क्र. ४१४, ५८, ३५, ३७ व ३९ च्या क्षेत्राबाबतदेखील उल्लेख करण्यात आलेला आहे. सदरचा निकाल हा वादीच्या विरूध्द आहे. अशा परिस्थितीत वादीने त्यालादेखील प्रतिवादी करणे अपेक्षित होते व त्याचे म्हणणे देखील घेणे अपेक्षित होते. अन्यथा या प्रकरणातील निकालाचा परिणाम त्या निकालावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय महत्वाचे म्हणजे मामलेतदार कोर्ट ॲक्ट प्रमाणे वहिवाटीच्या केसेस पूर्णपणे त्या कायदयान्वये चालने अपेक्षित आहे. त्यासंदर्भात वहिवाट केस क्र. ६/२०१५ याच्याविरूध्द रिव्हीजनदेखील प्रलंबित आहे. कुठलाही नकाशा समोर नसतांना व दाव्यातील कथनातून परिस्थीत स्पष्ट होत नसतांना अत्यंत मोघमरित्या मनाई हुकूम दिल्यास त्याला कुठलाही हक्क

राहणार नाही. याउलट महसूल अधिका-यांना प्रत्यक्ष जागेवर जावून पूर्वीचा अभिलेख तपासून त्या कायदयाप्रमाणे अधिक सखोल व व्यवस्थितपणे निर्णय घेण्याचे अधिकार असल्यामुळे अशाप्रकरणात दिवाणी न्यायालयाने हस्तक्षेप करणे अथवा मोघम स्वरूपात निष्कर्ष नोंदविणे योग्य ठरत नाही. वादीला महसूल अधिका-यांकडे कायदेशीररित्या दाद मागण्याचे अधिकार असल्यामुळे वादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचे कथन स्पष्ट नसतांना व त्याने आवश्यक तो नकाशा दाखल नसतांना, तसेच पूर्वीच्या वहिवाटी केस संदर्भातील केस संदर्भात कागदपत्रे दाखल नसतांना केवळ वादीच्या कथनावरून अथवा तथाकथीत फोटोच्या आधारावर निष्कर्ष काढणे अत्यंत धोकेदायक ठरू शकते.

१२. मामलेतदार कोर्ट ॲक्ट प्रमाणे महसूल अधिका-यांकडे अशा स्वरूपाचा वाद मिटविण्याची एक अधिकृत प्रक्रिया नमुद करण्यात आली असून प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशी करणे, लगत शेतक-यांचे जाब-जबाब व हरकती नोंदविणे इत्यादिंचे सविस्तर अधिकार दिलेले आहेत आणि त्यामुळे दिवाणी न्यायालयापेक्षा महसूल अधिका-यांना अधिक सक्षमपणे त्याबाबतील निर्णय देता येवू शकतो. **स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम ४१-एच** प्रमाणेदेखील पर्यायी व सक्षम मार्ग उपलब्ध असल्यास न्यायालयाने मनाई हुकूम नाकारला पाहिजे. सदर सर्व कारणांमुळे वादी त्याची प्रथमदर्शनी केस सिद्ध करू शकला नाही असे माझे मत झाले आहे. त्यामुळे **वादबिंदु क्र. १** चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

<u>**वादबिंदू क्र. २ व ३ बाबत**</u> -

१३. वादीला मनाई हुकम दिल्यास त्याचा वादी गैरफायदा घेवू शकतो व एखादयावेळी नसणारा रस्त्याचा वापर तो अधिकृत रस्ता म्हणून करून घेवू शकतो. याउलट त्याला मनाई हुकूम न दिल्यास त्याला निश्चितपणे महसूल अधिका-यांकडे दाद मागता येवू शकते व त्याचे होणारे नुकसान देखील टाळता येवू शकते. अशा प्रकरणात दिवाणी न्यायालयापेक्षा महसूल अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जावून, जूने रेकॉर्ड पाहून व इतर संबंधीत सर्व व्यक्तींचे म्हणणे विचारात घेवून अधिक सक्षमणपणे निर्णय देवू शकतात. त्यामुळे वादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. निश्चिमपणे सदर दिवाणी दावा प्रलंबित असल्यामुळे महसूल अधिका-यांनी कुठलीही कार्यवाही करू नये अशाप्रकारचा अडथळा अथवा युक्तीवाद तेथे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एक बाब देखील स्पष्ट करू इच्छितो की, सदर आदेशाचा अथवा त्यातील निष्कर्षाचा

कुठलाही परिणाम महाशय महसूल अधिका-यांच्या अधिकारावर अथवा प्रक्रियेवर होणार नाही. त्यामुळे **वादबिंदू क्र. २ व ३** चे उत्तर मी **नकारार्थी** देत आहे.

**वादबिंदु क्र. ४ करीता** -

१४. उपरोक्त कथनाप्रमाणे वादीला मनाई हुकूम न दिल्यास त्याचे फारसे नुकसान होणार नाही व दाव्याची गुंतागुंत वाढू शकते. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होणे आवश्यक असून स्वभाविकच सदरचा अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट होणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे **वादविंदु क्र. ४** करीता खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज **निशाणी क्र. ५** रद्द करण्यात येत आहे.

२. महाशय तहसिलदार अथवा सक्षम महसूल अधिकारी यांच्याकडे मामलेतदार कोर्ट ॲक्ट अथवा महाराष्ट् जमिन महसूल संहिता अधिनियम अथवा कुठल्याही कायदयांन्वये दोन्ही पक्षकारांना योग्य ती दाद मागितल्यास या आदेशाचा त्यांच्या अधिकार व कार्यपद्धतीवर कुठलाही परिणात होणार नाही.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

दिनांक - ३१/१०/२०१७

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.